पूर्वापार अकृत्रिम रुणानुबंध चालत आला आहे. त्यापेक्षां अधिकोत्तर ममता करून सर्व प्रकारें परामृश करावा ह्मणोन लिहिलें. तरी यापेक्षां विशेष काय आहे ? सर्व प्रकारें परामृशास अंतर होणार नाहीं. शपथ असे.

कोकणप्रांतें वतन व इनाम व मुकामे गांव आहेत. त्यास कांहीं उपसर्ग लागो न द्यावा ह्मणोन लिहिलें. तरी त्या प्रांतीचे कार्यपुरुषास आज्ञा करून पत्रें सादर केली आहेत. उपद्रव लागणार नाहीं

किल्ले गगनगडचे व खासगत गांवीची हवसीपट्टी माफ करावी ह्मणोन लिहिलें तरी तें बाब हवशाची आहे आह्मास रुपये भरून द्यावे लागतात यास्तव हबशीपट्टी दूर होत नाहीं.

मौजे उपळें व मौजे तारळें हे दोन गांव हिरसांवत याजकडेस मुकासा चालवावयासी लिहिले, तरी हरदूगांव जजिरे विजयदुर्गचे तनखेयांचे आहेत. याकरिता त्याजकडे चालणार नाहींत.

सांवतास तुह्मीं आह्मीं मिळोन नतिज्या द्यावा मुलुख सुटेल तो निमा तुमचा व निमा आमचा, ह्मणोन लिहिले तरी सावतास नतिज्या द्यावयाविशीं समर्थक अर्थ कळलियावरी विचार होणें तो होईल.

ता। सोमाळे येथील देशमुखी सुरळीत चालवावयाविशी लिहिलें तरी येविशी प्रस्तुत लिहावें ऐसें काय आहे ? याचा निवाडा होणे तो पूर्वीच होऊन गेला असे.

रत्नागिरीच्यासी बाडा व लोक सोडून द्यावयासी लिहिले. तरी केल्या नेमाप्रमाणें वर्तावें, गैररहा वर्तणूक न करावी, ये विशींचा अर्थ पूर्वी तुह्मांस लिहिला होता. हे गोष्टीस मध्यस्थ जाहल्यास लोक व सिबाडीस निरोप होईल. प्रस्तुत तें स्थल तुमच्या हुकुमाखेरीज जाहलें आहे हे गोष्टींचा निश्चय करून लिहून पाठविल्यानंतर लोकांची मुक्तता होईल. रत्नागिरी आपले हातीं खातरी करून देऊ.

श्रीच्या उत्साहास वार्षिकप्रमाणें अनुकूलतेविशीं लिहिले. तरी समयीं अनुकूल व्हावयास अंतर होणार नाहीं.

आह्मांकडील कारकून व आश्रित यांचीं घरे कोकणात आहेत. ते याजला द्यावयाविशीं लिहिलें तरी तुमचे आश्रित व कारकून कोणे गावीं नाहीं ऐसे नसे. जे आहेत ते कारकून आश्रित तुमचेच आहेत ऐसियास आगत्यागत्य मनास आणून ज्यास द्यावयाचें त्यास देऊं